# उत्तरपत्रिका


## विभाग – १ : गद्य

### पठित गद्य

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा.** **[०२]**

**उत्तर:**




*** (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) कोण ते लिहा.** **[०२]**

**(i) सहा वर्षांनी 'एफिशिएन्सी बार'च्या जाळ्यातून बाहेर पडलेले –**

**उत्तर:** अण्णा नाडगौडा

**(ii) 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' असा टोमणा देणारे –**

**उत्तर:** भिकोबा मुसळे

**(३) स्वमत** **[०३]**

**लेखकाला सर्वांनी वेड्यात काढण्याचे तुम्हांला समजलेले कारण सोदाहरण स्पष्ट करा.**

**उत्तर:** मला असे वाटते की, जर वजन कमी करण्यासाठी लेखकाने व्रत घेतले होते. आणि

लेखकाने हे व्रत सुरू केले आहे हे कचेरीत सर्वांना माहित होते. परंतु लेखकाने अण्णा नाडगौडाच्या प्रमोशनची पार्टी स्वीकारली कारण अण्णा नाडगौडा 'एफिशिएन्सी बार' च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. लेखकाने पार्टीतील सर्व पदार्थ मनसोक्त खाल्ले त्यानंतर स्वतःच्या डाएटबद्दल सर्वांना सांगितले म्हणून लेखकाला सर्वांनी वेड्यात काढले.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा.** **[०२]**

(i) लेखकाच्या वडिलांची परत बदली झालेले ठिकाण – पुणे

(ii) लेखकाच्या खेळाबाबत स्तुतीपर उद्‌गार काढणारे – वाय.एम.सी.ए. मधील खेळाडू

(iii) व्हॉलीबॉल चॅम्पियन असणारे – लेखकाचे वडील

(iv) सहा रुपयांत विकत घेतलेली वस्तू – जुनी बॅट

*** (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) का ते लिहा.** **[०२]**

**(i) लेखकाचा आनंद गगनात मावेना, कारण ________________.**

**उत्तर:** लेखकाच्या वडिलांनी लेखकाला दुकानात नेले व सहा रुपयांस एक जुनी बॅट विकत घेऊन दिली. म्हणून लेखकाचा आनंद गगनात मावेना.

**(ii) लेखकाच्या वडिलांनी लेखकाला संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले, कारण ________________.**

**उत्तर:** लेखक शाळा चुकवून ग्राउंडवर क्रिकेटचा मित्रत्वाचा सामना पाहात बसले होते म्हणून लेखकाच्या वडिलांनी लेखकाला संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले.

**(३) स्वमत** **[०३]**

**लेखकाचे तुम्हाला जाणवलेले गुण सोदाहरण स्पष्ट करा.**

**उत्तर:** लेखक लहानपणी जळणाच्या लाकडातून बॅट तयार करणे, जुना बॉल शोधून काढून त्याला खेळण्याच्या अवस्थेत आणणे. पोहणे, झाडावरील पेरू, कैऱ्या पाडून खाणे. यावरून लेखक धडपडून आपल्या आवडी पूर्ण करत होते. यावरून लेखक मेहनती होते हे लक्षात येते. तसेच वडीलधाऱ्यांना मान देणे हे त्यांच्या अंगी बाणवलेले असावे असे वाटते कारण ते त्यांच्या आई–वडीलांना, काकांना आदरयुक्त भीतीने उत्तर देत होते. किंवा ते सांगतील तसे वागत होते. मैदानावर सगळ्यात आधी जायचे त्यामुळे त्यांना सराव करायला जास्त संधी मिळत होती. दुसरे खेळाडू खेळत असतील त्यांचे सामने कौतुकाने

बघत आणि शिकण्याच्या उद्देशाने जर खाली जागा नाही मिळाली तर झाडावर चढून बघायचे. म्हणजेच लेखक अभ्यासू होते. लेखकाच्या याच गुणांमुळे ते यशस्वी खेळाडू म्हणून नावाजले गेले.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) उत्तरे लिहा.** **[०२]**

**(i) विद्यार्थ्यांसमोर असलेले 'आदर्श' त्रिकोणाचे घटक लिहा.**

**उत्तर:** शिक्षक – आई – वडील हाच विद्यार्थ्यांसमोरचा 'आदर्श' त्रिकोणाचा घटक आहे.

**(ii) योग्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमधले वाढीला लागणारे गुण लिहा.**

**उत्तर:** योग्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सभ्यपणा आणि स्वाभिमान हे गुण वाढीला लागतात.

* **(उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) प्रश्न तयार करा.** **[०२]**

**(i) राष्ट्राची प्रगती' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर:** विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या संबंधामागे कोणता विचार हवा?

**(ii) 'शिक्षक' हे उत्तर येईल, असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर:** विद्यार्थ्याला ज्ञानामृताचे कलश कोण खुले करून देत असतो?

## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[०२]**

**(१) चौकटी पूर्ण करा.**

(i) अभंगात वर्णिलेला चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी – चकोर

(ii) पिलांना सुरक्षितता देणारे – पक्षिणीचे पंख

(iii) व्यक्तीला सदैव सुख देणारा – योगी

(iv) वरवरचा मळ धुणारे – पाणी

(२) **आकृती पूर्ण करा.** **[०२]**

**योगीपुरुष आणि जीवन (पाणी) यांच्यातील फरक स्पष्ट करा.**

**उत्तर:**

| योगीपुरुष | जीवन (पाणी) |
|---|---|
| योगी पुरुष शरीर व मन दोन्ही शुद्ध करतात. (सबाह्य) | पाणी फक्त शरीर स्वच्छ करते. |
| मन आनंदी करतात. | फक्त तहान शमवते. |
| सर्व इंद्रिये तृप्त करतात. | फक्त जिभेला तृप्त करते. |

* **(कविता कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

**उत्तर:** (i) उदक – पाणी (ii) निजज्ञान – आत्मज्ञान

(iii) निर्मळ – स्वच्छ (iv) सुखदाता – सुख देणारा

**(४) 'योगीपुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे' हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.** **[०२]**

**उत्तर:** योगीपुरुष जन्माने आपल्यासारखेच 'सामान्य' असतात. त्यांच्या जीवनशैलीने ते स्वत:च्या मनावर नियंत्रण ठेवतात. त्यांचे कार्य त्यांच्यातील असामान्यत्व दाखवते. म्हणून आपण त्यांना 'योगी' म्हणतो.

अभंगात त्यांची तुलना पाण्याशी केली आहे. ज्याप्रमाणे पाण्यामुळे आपल्या शरीरावरील मळ स्वच्छ होतो, त्यामुळे फक्त शरीर स्वच्छ होते; परंतु योगी–संत यांच्या सहवासाने मन स्वच्छ होते आणि मन स्वच्छ झाले की सन्मार्ग मिळतो. त्यामुळेच आपले जीवन सुखी होते. म्हणजेच मन स्वच्छ असणे हे शरीर स्वच्छ असण्यापेक्षा श्रेष्ठ आहे. म्हणूनच म्हणतात, योगीपुरुष पाण्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

**प्रश्न २. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

**'रंग मजेचे रंग उदयाचे' किंवा 'हिरवंगार झाडासारखं'**

**'रंग मजेचे रंग उदयाचे'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री –** **[०१]**

**उत्तर:** कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी कवितेची रचना केली आहे.

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय –** **[०१]**

**उत्तर:** जागतिकीकरणाच्या या काळात संगणक–युग अवतरले असले तरी मातीशी संबंध तोडता कामा नये व पर्यावरणाची जोपासना केली पाहिजे, हा विषय या कवितेत मांडला आहे.

**(३) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश –** **[०२]**

**उत्तर:** पर्यावरणाची जोपासना करावी व निसर्गसौंदर्याचा आस्वाद घ्यावा.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण –** **[०२]**

**उत्तर:** प्रस्तुत कवितेत पर्यावरणाचे रक्षण करण्यास सांगितले आहे. निसर्गाचा चमत्कार दाखवणारी ही कविता मनाला प्रसन्न करते म्हणूनच आवडते.

**(५) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या शब्दांचा अर्थ लिहा –** **[०२]**

**उत्तर:** (i) सृष्टी – जग, विश्व (ii) वृष्टी – वर्षाव, पर्जन्य

(iii) दौलत – संपत्ती, पैसा (iv) तुष्टी – तृप्ती, संतोष

**'हिरवंगार झाडासारखं'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री –** **[०१]**

**उत्तर:** कवी जॉर्ज लोपीस

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय –** **[०१]**

**उत्तर:** मानवाचे जीवन हे झाडासारखे परोपकारी, हिरवेगार व प्रसन्न असावे. म्हणजेच मानवाचे जीवन कसे असावे, हा विषय कवितेत मांडला आहे.

**(३) प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश –** **[०२]**

**उत्तर:** मानवाने झाडांसारखे हिरवेगार, ताजे, प्रफुल्लित राहावे असा संदेश दिला आहे.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण –** **[०२]**

**उत्तर:** ही कविता झाडाच्या रूपातून माणसाला जीवनात कसे वागावे याचा संदेश देते. झाड जगत असताना ऊन, पाऊस, वारा, वादळ यांच्याशी झुंज देत खंबीरपणे उभे असते. त्याप्रमाणे माणसांनी जीवनात निर्धाराने उभे राहावे. झाडासारखी परोपकारी वृत्ती, सहनशीलता, दातृत्व या गुणांची महती समजून ते गुण अंगी बाणवावेत, असा संदेश मिळतो म्हणून मला ही कविता आवडते.

**(५) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या शब्दांचा अर्थ लिहा –** **[०२]**

**उत्तर:** (i) बाहू – भुज, दंड (ii) मुसाफिर – प्रवासी

(iii) वस्त्र – कापड (iv) मुकाट – शांतपणे

## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [०६]

**(१) टीप लिहा – व्युत्पत्तीकोशाचे कार्य.**

**उत्तर:** (i) शब्दाचे मूळ स्वरूप दाखवणे.

(ii) उच्चारातील बदल व फरक दाखवणे.

(iii) बदलाचे कारण स्पष्ट करणे.

(iv) अर्थातील बदल स्पष्ट करणे. अशा प्रकारचे कार्य व्युत्पत्तीकोश करते.

**(२) तुम्हांला समजलेली 'जाता अस्ताला' या कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.**

**उत्तर:** मूळ कविता गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांची असून त्याचे स्वैर रूपांतर श्यामला कुलकर्णी यांनी केले आहे. या कवितेतून कवीला हे जाणवून द्यायचे आहे, की या विश्वातील छोटीशी वस्तू किंवा जीव सर्व जगाला उपयोगी आहे.

वरील विधानाचे जिवंत उदाहरण म्हणजे पणती. अस्ताला जाताना सूर्याच्या मनात 'आपण अस्ताला गेल्यावर या विश्वाचे काय होईल?' असा विचार मनात येत होता परंतु पणतीने पुढे होऊन विश्वाची जबाबदारी घेण्याचे आश्वासन सूर्याला दिले.

थोडक्यात काय, तर सूर्याने दिवसभर विश्वाला प्रकाशित केले आणि अस्ताला जाताना आपल्यासाठी पर्यायी व्यवस्था आहे याची खात्री करून घेतली.

**(३) मेटलायझिंग प्रक्रियेवर लेखक डॉ. अनिल काकोडकर यांनी कसे काम केले ते तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर:** लेखक ट्रेनिंग संपवून 'बार्क'मध्ये इंजिनियर म्हणून जॉइन झाले. त्या वेळी त्यांना 'मेटलायझिंग' काम करण्यासाठी सांगण्यात आले. तेथे यंत्रसामग्री होती; पण ती कोणी वापरली नव्हती. त्यांना एक वेल्डर व एका फोरमनची गरज होती; पण त्यांना ती मिळाली नाही. वरिष्ठांची आज्ञा मानून लेखकाने कामाला सुरुवात केली. बरेच श्रम करून काम पूर्ण केले. त्या वेळी त्यांच्या श्रमाचे चीज झाले. नंतर त्यांना मदतही मिळाली. या ठिकाणी परिश्रम पुष्कळ आहेत. शेवटी एकटा माणूस काम करू शकत नाही असे नाही. असे लेखकाच्या लक्षात आले.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **[०२]**

**(i) मस्ती करू नका.**

**उत्तर:** आज्ञार्थी वाक्य

**(ii) तुम्ही काही झाडे लावली आहेत का?**

**उत्तर:** प्रश्नार्थक वाक्य

**(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** **[०२]**

**(i) पांढरा रंग कोणाला आवडत नाही? (विधानार्थी करा.)**

**उत्तर:** पांढरा रंग सर्वांना आवडतो.

**(ii) ताजमहालचे सौंदर्य अवर्णनीय आहे. (उद्गारार्थी करा.)**

**उत्तर:** खरंच! ताजमहालचे सौंदर्य अवर्णनीय आहे.

**(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा. (फक्त दोन) [०४]**

**(i) कवेत घेणे – मिठीत घेणे.**

**उत्तर:** लढाईत विजय मिळवून आलेल्या मुलाला वडिलांनी कवेत घेतले.

**(ii) भान ठेवणे – जाणीव ठेवणे.**

**उत्तर:** एखाद्याने आपल्याला मदत केली तर त्याचे भान ठेवणे फार जरुरी आहे.

**(iii) झोकून देणे –** पूर्णपणे सहभागी होणे.

**उत्तर:** मातृभूमीसाठी लढणारे जवान प्रसंगी स्वत:ला झोकून देतात.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती**

**(१) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [०१]**

**उत्तर:** (i) मान x अपमान (ii) स्वच्छ x अस्वच्छ

**(२) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. [०१]**

**उत्तर:** पायात चप्पल न घालता – अनवाणी

**(३) वचन ओळखा. [०१]**

**उत्तर:** (i) फरशी – एकवचन (ii) पिल्ले – अनेकवचन

**(४) लिंग बदला. [०१]**

**उत्तर:** (i) वाघीण – वाघ (ii) पती – पत्नी

**(२) लेखननियमांनुसार लेखन.**

**लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा. [०२]**

**उत्तर:** (i) जनमदिवस/जन्मदिवस/जन्मदीवस/जनमदीवस – जन्मदिवस

(ii) अलंकार/आलंकार/आंलकार/आलंकर – अलंकार

**(३) विरामचिन्हे**

**खालील विरामचिन्हे ओळखून त्यांची योग्य नावे लिहा. [०२]**

**उत्तर:** (i) “......” – दुहेरी अवतरण चिन्ह

(ii) , – स्वल्पविराम

(iii) ! – उद्गारार्थी

(iv) ? – प्रश्नार्थी

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[०६]**

**पत्रलेखन.**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

दिनांक: २७ नोव्हेंबर, २०२०.

प्रति,

शक्ती स्पोर्टस्

मयूर कॉलनी,

अकोला – ५४१ ००३.

**विषय:** खेळाच्या साहित्याची मागणी करणारे पत्र.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार,

मी अक्षय चव्हाण, न्यू इंग्लिश स्कूल, अकोला या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी आहे. आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना खेळाच्या साहित्यांची आवश्यकता आहे. त्यांची यादी मी खाली लिहिली आहे. त्याप्रमाणे दिलेल्या पत्त्यावर सर्व साहित्य त्वरित पाठवण्याची व्यवस्था करावी. साहित्याचे बिल सोबत पाठवावे म्हणजे बिलाची रक्कम त्वरित पाठवता येईल. माझा ई–मेल आयडी दिलेला आहे. आपल्या बँक खात्याचा तपशीलही कळवावा.

**साहित्याची यादी**

(१) बॅट – ५ नग
(२) स्टंप – ४ सेट
(३) सीझन बॉल – १० नग
(४) हेल्मेट – ५ नग
(५) स्पोर्ट शूज १० नंबर – २ जोड
(६) क्रिकेट पॅड – ५ जोड

धन्यवाद.

आपला नम्र,

अक्षय चव्हाण,

विद्यार्थी प्रतिनिधी,

न्यू इंग्लिश स्कूल,

अकोला – ५४१ ००३.

ई–मेल आयडी – akshay09@gmail.com

**किंवा**

**सवलतीच्या दरात खेळाचे साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल व्यवस्थापकांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: ३० नोव्हेंबर, २०२०.

प्रति,

माननीय व्यवस्थापक,

शक्ती स्पोर्टस्,

मयूर कॉलनी,

अकोला – ५४१ ००३.

**विषय :** खेळाचे साहित्य सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिल्याबद्दल अभिनंदन

माननीय महोदय,

मी अक्षदा चव्हाण, न्यू इंग्लिश स्कूल, अकोला या शाळेची विद्यार्थीनी प्रतिनिधी आहे.

आपण 'शक्ती स्पोर्टस्' या नावाने खेळाच्या साहित्याची विक्री करता. तसेच शाळेसाठी आपण खेळाचे साहित्य सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिले यासाठी विद्यार्थीनी प्रतिनिधी या नात्याने सर्व विद्यार्थी वर्गा तर्फे आपले अभिनंदन करत आहे.

धन्यवाद.

आपली विश्वासू

अक्षदा चव्हाण,

विद्यार्थीनी प्रतिनिधी,

न्यू इंग्लिश स्कूल

अकोला – ५४१ ००३.

ई–मेल आयडी – akshada18@gmail.com

**(किंवा)**

**सारांश लेखन.**

* **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर: सारांश:** निसर्ग हा उत्तम शिक्षक आहे. निसर्गातील प्रत्येक गोष्टीपासून आपण खूप गोष्टी शिकू शकतो. सूर्य, चंद्र, भरती, ओहोटी यांचे वेळापत्रक बघून नियमिततेचे महत्त्व आपल्यास समजते. मधमाशी कष्टाचे महत्त्व शिकवते. पाणी चैतन्य निर्माण करते. नदी प्रगतीचा संदेश देते. वृक्ष परोपकाराची वृत्ती शिकवतात. पर्वत धैर्याचा संदेश देतात. यातूनच आपण स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडवू शकतो.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [१०]

**(१) जाहिरात लेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**



# A टू Z स्कॉलर्स

**आमच्याकडे सर्व प्रकारची पुस्तके, वह्या व शालेय उपयोगी सर्व साहित्य उपलब्ध**

**आमची वैशिष्ट्ये**

- शाळेसाठी १०% सवलत
- प्रत्येक खेळासाठी मार्गदर्शक उपलब्ध
- ऑनलाईन पेमेंट करण्याची सोय
- व्हॉटसअ‍ॅप द्वारे मागणी नोंदवू शकता.
- मेल द्वारेही मागणी नोंदवू शकता.

whatsaap no : 9222210 email : atoz1912@gmail.com

**पत्ता** – A टू Z स्कॉलर्स, चांदिवली रोड, पवई – ४०००१२

**(२) बातमी लेखन**

**खालील विषयावर बातमी तयार करा.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

आमच्या वार्ताहराकडून, दि. १७ डिसेंबर

जीवनज्योत विद्यालय, पिंपरी येथे शाळेच्या हिरक महोत्सवानिमित्त 'मराठी निबंध लेखनाची कार्यशाळा' आयोजित केली होती.

या कार्यशाळेत इ. १० वीच्या विद्यार्थी – विद्यार्थीनींनी भाग घेतला होता.

ही कार्यशाळा १६ डिसेंबरला सकाळी १०:०० ते १:०० व संध्याकाळी २:०० ते ५:०० अशा दोन सत्रात विभागली होती. १:०० ते २:०० मध्यांतर होते.

तज्ज्ञ मार्गदर्शिका श्रीमती मधुरा महाजन यांनी विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन केले.

**(३) कथालेखन.**

**खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **करावे तसे भरावे**

एका जंगलात उंट, कोल्हा, हरीण, हत्ती असे अनेक प्राणी राहात होते. हे सर्व प्राणी जंगलात फिरत असतात. जंगलात राहतात. त्यांचं जीवन जंगलात सुरक्षित असतं असं नाही. परंतु त्यांना जंगलात रहायला आवडते.

याच जंगलात उंट व कोल्हा असे दोन मित्र राहात असतात. एकदिवस उंट व कोल्हा गप्पा मारत-मारत फिरत असतात. थोड्याच वेळात उंटाला भूक लागते म्हणून उंट आपले भक्ष शोधत फिरत होता. फिरता फिरता उंट नदीच्या काठाशी आला. नदीच्या आसपास बघत असताना उंटाचे लक्ष नदीपलीकडील उसाच्या शेताकडे गेले. ऊस मस्त वाढला होता.

उंटाने ठरवले की आपण नदीच्या पाण्यातून जाऊ आणि ऊस खाऊ. त्याच्या मनातील विचार त्याने अंमलात आणायचा ठरवला आणि तो पाण्यात उतरणार तेवढ्यात कोल्ह्याने त्याला विनंती केली की, मला तुझ्या पाठीवर बसव आणि उसाच्या शेतात घेऊन चल. मी उंचीला कमी आहे. मी नदीतून चालत जाऊ शकत नाही.

शेवटी मित्र म्हणतोय म्हणून उंटाने त्याला आपल्या पाठीवर बसवले. दोघेही उसाच्या शेतात गेले व ऊस खाऊ लागले.

उंटापेक्षा कोल्हा ऊस खाऊन लवकर तृप्त झाला. ऊस खाऊन झाल्यावर कोल्हा कोल्हेकुई करू लागला. उंटाने त्याला २-३ वेळा आवाज करू नकोस असे सांगितले. तरी कोल्हा आवाज करत राहिला. कोल्ह्याचा आवाज ऐकून शेताचा मालक धावत आला. त्याने उंटाला मारले. खूप बदडले. कोल्हा मात्र शेतात लपून बसला. त्यामुळे त्याला मार मिळाला नाही.

मार खाल्ल्यामुळे उंटाला चालता येत नव्हतं. उंट हळूहळू नदीपर्यंत आला. ते कोल्ह्याने बघितले आणि तो उंटाच्या पाठीवर बसला. उंट नदीच्या मध्यापर्यंत आला आणि कोल्ह्याला म्हणाला, ''आता मला झोप येते, मी झोपतो.'' असे म्हणून उंट नदीच्या पाण्यात बसू लागला. कोल्ह्याने उंटाला असे न करण्याची विनंती केली. पण उंटाने कोल्ह्याचे ऐकले नाही. कोल्हा पाण्यात पडला. कोल्ह्याला नदीतून चालता येईना आणि कोल्ह्याचा अंत झाला.

**प्रश्न ५. (इ) लेखन कौशल्य.** **[०८]**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.**

**(१) प्रसंगलेखन.**

**'अकस्मात पडलेला पाऊस'**

*** (मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** आभाळ भरून आले होते. संध्याकाळची वेळ, पक्षी आपल्या घरट्याकडे परतत

होते. पूर्ण अंधारही नाही व प्रकाशही नाही. थंडगार वारा व पानांची सळसळ अशा प्रसन्न व आल्हाददायक वातावरणात आम्ही उभे होतो लोणावळ्याच्या एका टेकडीवर.

अनेक पर्यटक प्रसन्न वातावरणाची मजा घेण्यासाठी लोणावळ्यात आले होते. रस्त्यावरील मक्याची गरमा-गरम कणसे व वडापाव खात आम्ही लोणावळ्यातील सुंदर निसर्गाचा आस्वाद घेत होतो आणि अचानक पाऊस सुरू झाला.

पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या व आम्ही मनसोक्त भिजत होतो. हळूहळू पावसाचा जोर वाढत होता. डोंगरावरून पाऊस खाली कोसळत होता. जणू काही सगळीकडे छोटे छोटे धबधबे तयार झाले होते. पाणी फेसाळत, घोंगावत खाली येत होते. संपूर्ण परिसर जलमय झाला होता. हिरवीगार सृष्टी पावसात न्हाऊन निघाली होती. नदी, नाले व रस्त्यावरील खाचखळगे पाण्याने भरून गेले होते. रस्त्यावरील वाहतूक पाण्याच्या प्रवाहाने मंदावली होती. पर्यटकांनी आपल्या वाहनातून खाली उतरून रस्त्यावरील कडेला उपलब्ध असलेल्या चायनीज स्टॉलवर व चहाच्या टपरीवर गर्दी केली होती. आम्हीसुद्धा एका चहाच्या टपरीवर सहकुटुंब गेलो.

आकाशात विजा चमकू लागल्या. ढगांचा गडगडाट व मुसळधार पाऊस यांनी मात्र आता रौद्र स्वरूप धारण केले. मंदावलेली वाहतूक आता पूर्णपणे बंद पडली होती. सगळीकडे पाणीच पाणी झाले होते.

चिंब भिजलेल्या शरीराला आता हुडहुडी भरल्याने पाऊस थांबावा, अशी इच्छा मनात निर्माण झाली. थंड शरीराबरोबर पाऊसही हळूहळू थंड झाला व अंधार पडू लागला. पाणी ओसरू लागले, वाहतूक सुरू झाली. यात्रेकरूही आपल्या परतीच्या मार्गाने घरी जाऊ लागले व आम्हीही आमच्या गाडीत बसून मुंबईला प्रयाण केले. लोणावळामधील एक अविस्मरणीय आनंददायी पावसाला स्मृतीत घेतच आम्ही घरी पोहचलो.

**(२) आत्मकथन.**

**दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीत लिहिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा.**

*** (मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **सूर्य**

''माझ्या आगमनाने जनजीवनाची सुरुवात होते. होय, मी सूर्य बोलतोय! मला अनंत नावे आहेत. प्रात:काली पूर्व दिशा गुलाबी रंगाने उजळून निघते व हळूहळू मी जगताचा पिता क्षितिजावरून वरवर येऊ लागतो. अंधकाराची जागा कोवळ्या सूर्यकिरणांनी व्यापून टाकली जाते. दवबिंदूंचा शिडकावा पडल्यामुळे सर्वत्र मातीचा सुगंध दरवळत राहतो.''

''सर्व प्राणिमात्रांवर मी कृपा करतो. दुपारची माझी किरणे लोकांना तापदायक वाटतात, पण त्याला माझा नाइलाज आहे. या कडकडीत सूर्यकिरणांमुळे घाणीचे, रोगांचे निर्मूलन होते.''

''ऋतुमानाप्रमाणे माझ्या उगवण्याच्या व अस्ताच्या वेळेत फरक होतो असे लोकांना वाटते, पण तसे नसते. पुष्कळ वेळा पावसाच्या वेळी ढगाळ वातावरण असते. थंडीच्या दिवसांत धुके असते. त्यामुळे वातावरणातील फरक जाणवतो. माझे अस्तित्व इतके

महत्त्वपूर्ण आहे, की ज्या ठिकाणी मी प्रवेश करत नाही (उत्तर ध्रुव, दक्षिण ध्रुव) जेथे सहा महिन्यांचा दिवस आणि सहा महिन्यांची रात्र असा काळ असतो, तेथील लोक माझी पूजा करतात. ग्रहणकाळात माझी प्रतिष्ठा राखली जाते. समुद्रातील भरती-ओहोटीवरही माझ्यामुळे परिणाम होतो.''

''मला सूर्यनारायण म्हणतात. पांडवांचा भाऊ कर्ण तर रोज मला (सूर्याला) अर्घ्य देऊन नमस्कार करत असे.''

''भूतलावरील सर्व प्राणिमात्र, चराचर सृष्टी सगळ्यांनाच माझी मदत होते. मी सर्वांच्या उपयोगी आहे, पण मला त्या कामाबद्दल जरासुद्धा अहंकार नाही.''

''जर सूर्य नसेल तर जगाच्या अस्तित्वाला काही अर्थच उरणार नाही.''

**(३) वैचारिक.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर: 'वर्तमानपत्राचे महत्त्व'**

संगणकामुळे आजकाल सर्वच गोष्टी 'ऑनलाईन' मिळायला लागल्यात. टीव्हीवर इतके चॅनल्स आहेत की त्यामुळे घटना घडली की काही सेकंदातच आपल्यापर्यंत बातमी येते.

हे खरं असलं तरी वर्तमानपत्र हेच बातम्या वाचायचे सुंदर अनुभव देणारं माध्यम आहे. कितीही प्रगती झाली तरी वर्तमानपत्राचे वाचन समाधान देणारे असते. याबद्दल दुमत नाही.

वर्तमानपत्र वाचताना बातम्या, लेख, अग्रलेख, जाहिराती सर्व आपल्या समोर असते. आपल्याला जे वाचायचे असेल ते वाचू शकतो.

परंतु दूरदर्शनवर मात्र जे दिसतं तेच बघावं लागतं, ऐकावं लागतं. त्यांच्या नियमाप्रमाणे आणि वेळेप्रमाणे बातम्या, जाहिराती तसेच ठळक घडामोडींवर विशेष कार्यक्रम प्रसारित करतात.

वर्तमानपत्र वाचताना काही महत्त्वाच्या नोंदी असतात, टीप असतात, सूचना असतात. बाजारभाव असतात. जाहिराती, नोकरी, घर, जागा, खरेदी-विक्री सर्व वाचायला मिळते.

'ऑनलाईन'चं मात्र तसं नाही. प्रत्येक गोष्टीसाठी साईट असते. लिंक असते. मिळालं नाही तर शोधावं लागतं आणि महत्त्वाचं म्हणजे स्क्रीनच्या मर्यादा असतात. वर्तमानपत्राचं असं नाही. एका ठिकाणी बसून आपले दोन्ही हात जेवढे पसरू शकतात तेवढा पेपर पसरू शकतो. एका वेळेस दोघं पेपर वाचू शकतात. काही पान एकेकच असतात. त्यामुळे वर्तमानपत्राचं तेवढंच पान घेऊन एखादी व्यक्ती दुसरीकडे बसून वाचू शकते.

वर्तमानपत्र वाचल्याशिवाय समाधान मिळत नाहीच पण दिवसभर चुकल्या-चुकल्यासारखं वाटत राहतं.

म्हणून वर्तमानपत्र आणि वर्तमानपत्राचे महत्त्व खूप आहे आणि हे अबाधित सत्य आहे.

★★★